महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | सोमवार, दि. ९ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक ११७ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१६५० : संत तुकाराम यांचा निर्वाणदिन.
१८७२ : अरविंद घोष यांचा जन्मदिन.
१९५२ : पुणे येथे पेशवे उद्यान प्राणी संग्रहालयाचे उद्‌घाटन झाले.
१९८२ : सूर्यमालेतील सर्व ग्रह सूर्याच्या बाजूला आलेले असण्याचा अपूर्वयोग.
१९९४ : अभिनेत्री देविकाराणी यांचे निधन.

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ७८,९१८.९० | -१,०९७.०० (१.३७%) |
| डॉलर | ₹ ९१.९० | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ४० | १७ |
| दिल्ली | ३५ | १९ |
| मुंबई | ३७ | २२ |
| नागपूर | ३७ | १९ |
| पुणे | ३८ | १३ |

**सुविचार**

प्रत्येक अडथळा हा यशाच्या मार्गातील एक पायरी आहे. स्वाभिमान जागृत ठेवा, यश नक्की मिळते.

| सुर्योदय | - | सुर्यास्त |
|---|---|---|
| स.-६:४२ | | संध्या-६:३५ |

**सोने - चांदी**

| सोने(१० ग्रॅम) | - चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,६५,७८०/- | २,८५,०००/- |

**केळी भाव**


नवती : ---- ते ----
पिल बाग : ---- ते ----
कांदे बाग : ----

# खामेनींच्या हत्येचा बदला घेतल्याशिवाय मागे हटणार नाही

## इराणचे सुरक्षा प्रमुख अली लारीजानी यांनी अमेरिकेला दिला इशारा

वृत्तसंस्था । तेहरान

**मध्यपूर्वेत अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र होत चालला आहे. इराणच्या सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूनंतर परिस्थिती अधिक चिघळली असून इराणकडून अमेरिकेच्या लष्करी तळांवर आणि मालमत्तांवर हल्ले केल्याचा दावा केला जात आहे. या पार्श्वभूमीवर इराणचे सुरक्षा प्रमुख अली लारीजानी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना कठोर इशारा दिला आहे.**





२८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्रायलने संयुक्त कारवाई करत इराणवर हल्ला केला होता. या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला. तसेच या युद्धात आतापर्यंत शेकडो इराणी नागरिकांचा मृत्यू झाल्याचे सांगितले जात आहे. या घटनेनंतर इराणने बदला घेण्याची भूमिका घेतली आहे.

**'आम्ही बदला घेणार' : अली लारीजानी**

इराणचे सुरक्षा प्रमुख अली लारीजानी यांनी सरकारी दूरचित्रवाणीशी बोलताना स्पष्ट इशारा दिला की, 'आमच्या नेत्याच्या रक्ताचा बदला घेतल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही. डोनाल्ड ट्रम्प यांनी जे केले त्याची किंमत त्यांना चुकवावी लागेल. त्यांनी आमच्या नेत्याला मारले आणि हजाराहून अधिक लोक शहीद झाले. ही साधी गोष्ट नाही'.

### ➤ डोनाल्ड ट्रम्प काय म्हणाले?

दरम्यान, लारीजानी यांच्या वक्तव्यांवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. मीडियाशी बोलताना ट्रम्प म्हणाले, 'तो कोण आहे, तो काय बोलतो आहे याची मला काहीच कल्पना नाही. मला त्याची अजिबात पर्वा नाही'. त्यांनी इराणी नेतृत्व कमकुवत झाल्याचा दावा करत अमेरिकेच्या लष्करी कारवाया सुरू राहतील असेही स्पष्ट केले. ट्रम्प यांनी पुन्हा एकदा इराणने 'बिनशर्त शरणागती' स्वीकारावी, अशी मागणी केली. त्यामुळे मध्यपूर्वेतील तणाव आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### ➤ ट्रम्पला सोडणार नाही : इराणचे सुरक्षा प्रमुख

लारीजानी यांनी पुढे सांगितले की, ट्रम्प यांनी इराणच्या प्रतिक्रियेचा चुकीचा अंदाज लावला आहे. त्यांना वाटले व्हेनेझुएलामध्ये जे घडले ते इराणमध्येही घडेल. पण आता ते स्वतःच या संघर्षात अडकले आहेत. आम्ही ट्रम्पला सोडणार नाही, असे ते म्हणाले. याचबरोबर सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट करत त्यांनी पुन्हा एकदा इशारा दिला की, 'जोपर्यंत आम्ही बदला घेत नाही, तोपर्यंत आम्ही मागे हटणार नाही'.

# राज्यात कुठेही इंधनाचा तुटवडा नाही

## पीएम नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात सरकार परिस्थितीचा सामना करण्यास सक्षम : मुख्यमंत्री फडणवीस

वृत्तसंस्था । मुंबई

**इराण विरुद्ध इस्त्रायल-अमेरिका युद्धामुळे राज्यात इंधन तुटवडा निर्माण झाल्याचा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरकसपणे फ ` टाळून लावला आहे. राज्यात कुठेही इंधनाचा तुटवडा नाही. माध्यमांनी काही शहरांत पेट्रोल-डिझेलचा तुटवडा निर्माण झाल्याचे वृत प्रकाशित केले आहे. विशेषतः तेल कंपन्यांनी पुण्यातील वितरकांना पैसे दिल्याशिवाय इंधन देण्यास नकार दिल्यामुळे राज्यात इंधन टंचाई निर्माण झाल्याचा दावा केला जात आहे. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पत्रकारांशी संवाद साधताना हा दावा जोरकसपणे फेटाळून लावला आहे.**

**कुठेही इंधन टंचाई नाही : मुख्यमंत्री**

मुख्यमंत्री म्हणाले, लोकांना चुकीची माहिती देऊन पॅनिक तयार करण्याची गरज नाही. केंद्र सरकारने यासंदर्भातील आपली भूमिका अत्यंत स्पष्टपणे मांडली आहे. भारताच्या ऊर्जा सुरक्षेसंबंधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कशाप्रकारे पाऊले उचलली हे आपल्यासमोर आले आहे. सध्या राज्यात कुठेही इंधन टंचाई नाही.

काही माध्यमांनी दोन-तीन दिवस झाले पेट्रोल - डिझेलचा तुटवडा निर्माण होणार असल्याच्या बातम्या दिल्या. (पान २ वर)



### घरगुती अन् व्यावसायिक गॅसच्या किंमतीत वाढ

उल्लेखनीय बाब म्हणजे इराण युद्धामुळे सध्या भारतात एलपीजी गॅसचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता आहे. सरकारने व्यावसायिक गॅसच्या दरात अचानक १५० ते २०० रुपयांची वाढ केली आहे. यामुळे हॉटेल व्यवसाय कसा चालवायचा? हा प्रश्न व्यावसायिकांपुढे उभा राहिला आहे. दुसरीकडे, घरगुती गॅसच्या दरातही एकरकमी ६० रुपयांची वाढ झाली आहे. यामुळे सर्वसामान्यांचेही बजेट कोलमडले आहे. त्यातच काही शहरांत गॅसचा पुरवठा कोलमडल्यामुळे स्थिती बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या प्रकरणी पुण्यातील महिलांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. देशात गॅसचे दर वाढत आहेत. तेलाचे दर वाढत आहेत. किराणा व इतर जीवनावश्यक वस्तूंचेही दर वाढले आहेत. पण आमचे पगार काही वाढत नाहीत. गॅस एजन्सीकडे गेल्यानंतर अनेक वेळा वेळेवर गॅस मिळत नाही, अशी ओरड या महिलांनी केली आहे.

## थोडक्यात



### ऑस्ट्रेलियाने ३ दिवसांतच उडवला भारताचा धुव्वा!

**मुंबई ।** ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकमेव दिवस-रात्र कसोटी सामन्यात भारतीय महिला संघाला मानहानीकारक पराभवाचा सामना करावा लागला आहे. पर्थच्या वेगवान खेळपट्टीवर भारतीय फलंदाजांनी नांगी टाकली, ज्यामुळे ऑस्ट्रेलियाने हा सामना तिसऱ्या दिवशी पहिल्याच सत्रात १० विकेट्सनी जिंकून मल्टी-फॉर्मेट मालिका ५-२ ने आपल्या नावावर केली.

### फॅमिली कोर्टात महिला वकिलांचा दबदबा!

**मुंबई ।** शहरातील कुटुंब न्यायालयात तब्बल ४५० पेक्षा जास्त महिला वकिल कार्यरत असून त्या संवेदनशीलपणे कौटुंबिक प्रकरणे केवळ हाताळत नाहीत. तर, प्रभावीपणे वकील म्हणून आपली भूमिका मांडताना दिसतात. नवरा-बायकोच्या अहंकारामुळे अनेक प्रकरणे घटस्फोट होतो तर बहुतांश प्रकरणात नवरा बायकोला एकत्र आणायचे कामही त्या करताना दिसतात.

रविवारी महिला दिन आहे. या पार्श्वभूमीवर घेतलेला आढावा. देशातील विविध राज्यातील कौटुंबिक न्यायालयांसाठी आदर्शवत मॉडेल ठरावे, अशा या कुटुंब न्यायालयात महिला वकिलांची संख्या तब्बल ४५०पेक्षा जास्त आहे. पुरूष वकिलांची संख्या २००च्या आसपास आहे.



### 'या' लोकांना मिळणार नाही गॅस सिलिंडर

**दिल्ली ।** घरगुती गॅस सिलिंडरच्या किंमतीत वाढ झाली असून, पुरवठा नियंत्रित करण्यासाठी तेल विपणन कंपन्यांनी नवीन नियम लागू केले आहेत. अनेक ग्राहकांचे केवायसी प्रलंबित असल्याने गॅस वितरकांकडे साठा कमी होत आहे. नवीन नियमांनुसार, केवायसी पूर्ण न केलेल्या ग्राहकांना घरगुती गॅस सिलिंडर मिळणे कठीण होऊ शकते. काही अहवालांनुसार, ऑनलाइन बुकिंगसाठी केवायसी अनिवार्य झाले आहे.

एक कोटीची डील; पहिला हप्ता २० लाखांचा

# नाशिकचा जीएसटी अधिकारी मुंबई एसीबीच्या जाळ्यात

वृत्तसंस्था । नाशिक

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) कार्यक्षेत्रात नाशिकमधील लाचखोरीच्या तक्रारी थेट मुंबईत पोहोचून तेथून अधिकारी येत नाशिकमध्ये सापळे रचून लाचखोरांना बेड्या ठोकत असल्याचे वास्तव आहे. दोन महिन्यांत सलग दुसऱ्यांदा या स्वरूपाची कारवाई झाली असून, आता मुंबई पथकाने नाशिकच्या जीएसटी अधिकाऱ्यांसह खासगी व्यक्तीला अटक केली आहे. तरीही नाशिक एसीबीच्या पथकाने कानावर हात ठेवल्याने कार्यपद्धतीवर बोट ठेवले जात आहे.**



विशेष म्हणजे, मुंबईचे पथक सापळा रचून फिर्याद दिल्यानंतर नाशिकच्या पथकाकडे तपास सोपविण्यात येतो. मात्र, त्यानंतर मालमत्तेची घरझडती, जप्ती व इतर तपासासंदर्भात स्पष्टपणे माहिती देण्यास अथवा पुढील कार्यवाहीबाबत कमालीची गोपनीयता बाळगण्यात नाशिक एसीबीचे पथक धन्यता मानत आहे. दरम्यान, जीएसटी कार्यालयातील राज्यकर उपायुक्त संशयित (पान २ वर)

# अल्पसंख्याक शाळांची तपासणी, शिक्षण उपसंचालकांचे आदेश

वृत्तसंस्था । पुणे

**अल्पसंख्याक दर्जाप्राप्त शाळांमध्ये एकूण प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी किमान ५१ टक्के विद्यार्थी संबंधित अल्पसंख्याक घटकातील असण्याच्या निकषाची शाळांकडून पूर्तता होत आहे की नाही, याबाबत तपासणी करण्याचा आदेश विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे यांनी दिला आहे. निकषांची पूर्तता होत नसलेल्या शाळांवर कारवाई करण्याबाबचत चौकशी करून अहवाल सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.**



पुणे शहरात मोठ्या संख्येने अल्पसंख्याक दर्जाप्राप्त शाळा कार्यरत आहेत. गेल्या चार-पाच वर्षांत अनेक शाळांनी शिक्षण हक्क कायद्यांतर्गत २५ टक्के प्रवेशाच्या अटीतून सूट मिळवण्यासाठी भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्राप्त केल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र, प्रत्यक्ष प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या तपासल्यास संबंधित अल्पसंख्याक घटकातील विद्यार्थ्यांचे प्रमाण अत्यल्प असून, बिगरअल्पसंख्याक विद्यार्थ्यांची संख्या अधिक असल्याचे आढळून येत आहे.

शासनाच्या विद्यमान नियमांनुसार, अल्पसंख्याक दर्जाप्राप्त शाळांमध्ये एकूण प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी किमान ५१ टक्के विद्यार्थी संबंधित अल्पसंख्याक घटकातील असणे आवश्यक आहे. मात्र, अनेक शाळांमध्ये या निकषाची पूर्तता होत नसल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थिसेनेचे पुणे शहराध्यक्ष धनंजय दळवी यांनी केला. तसेच त्या अनुषंगाने सर्व अल्पसंख्याक शाळांची गेल्या तीन वर्षांतील प्रवेशप्रक्रिया, ५१ टक्के निकषाची पूर्तता, तसेच (पान २ वर)

**सध्या आरटीईअंतर्गत विद्यार्थी नोंदणीची प्रक्रिया राबवण्यात येत आहे. ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी १० मार्चपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. आरटीई प्रवेशांच्या कार्यपद्धतीमध्ये बदल करण्यात आला आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांच्या निवासस्थापासून एक किलोमीटरच्या परिसरातील शाळाच प्रवेशासाठी निवडता येणार आहे. मात्र हा बदल चुकीचा असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे.**

# महागाई वाढणार हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ

## राज्याच्या कृषिमूल्य आयोगाच्या अध्यक्षांचे विधान

वृत्तसंस्था । पुणे

**'युद्धामुळे जगातील बाकी देशांत माणसे मरत आहेत. भारताचे नुकसान होत आहे. गॅस परदेशातून आयात होत असल्याने त्याच्या किमती वाढणारच आहेत. महागाईचे समर्थन करणार नाही. पण, जगाला जाळ लागलेला आहे. त्यामुळे महागाई वाढणार हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे', असे विधान राज्याच्या कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी शनिवारी केले.**



डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या आयएमडीआरमध्ये आयोजित बांबू प्रदर्शनाला भेट दिल्यानंतर पटेल यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्या वेळी ते बोलत होते. 'युद्धामुळे निर्यात होणारा शेतीमाल अडकून पडलेल्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी देवेंद्र फडणवीस यांचे सरकार कायम तत्पर आहे. तसेच, मीही त्या दृष्टीने पुढाकार घेणार आहे', असेही त्यांनी सांगितले.

पटेल म्हणाले, 'बांबू उत्पादनात चीन भारतापेक्षा पुढे आहे. पण, आता आपल्याकडे धडपड सुरू झाली आहे. मानवजात वाचविण्यासाठी प्लास्टिक बंद करावे लागणार आहे. बांबू हा प्लास्टिकला पर्याय ठरू शकतो. आतापर्यंत लाकडी सामानासाठी झाड तोडावे लागायचे. बांबू न (पान २ वर)


**'घड्याळ, चष्मा, कपडे अशी अनेक उत्पादने बांबूपासून तयार होतात. ४५० पीपीएम कार्बन उत्सर्जन झाल्यास माणूस दिसणार नाही. त्यामुळे माणसाचे अस्तित्व टिकण्यासाठी खनिज तेलाचा वापर थांबवून जैवइंधन, हरित आच्छादनात वाढ करावी लागणार आहे. बांबू केवळ तीन वर्षांत वाढतो, झाडे वाढायला तीस वर्षे लागतात. सध्या ७८ हजार कोटी रुपयांचे लाकूड आयात केले जाते. लाकडाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी २५ ते ३० वर्षे लागतील. मात्र, बांबू लागवड केल्यास ३० वर्षांच्या झाडाइतके लाकूड उपलब्ध होणार आहे', असे त्यांनी नमूद केले.**

# महिलांनी क्रीडा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे : रक्षा खडसे

## महिलादिनी 'अस्मिता लीग'चे उद्‌घाटन

वृत्तसंस्था । छ.संभाजीनगर

**जागतिक महिला दिनानिमित्त महिलांमध्ये क्रीडाविषयी जागरूकता वाढावी आणि शहरी तसेच ग्रामीण भागातील महिलांना खेळांमध्ये अधिक संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने आयोजित 'अस्मिता लीग'चे उद्‌घाटन केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते झाले यावेळी बोलताना महिलांनी क्रीडा क्षेत्रात मोठ्याप्रमाणात सहभागी व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.**



जागतिक महिला दिनानिमित्त विभागीय क्रीडा संकुल मैदानावर महिलांसाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्री खडसे यांनी सायकल स्पर्धा आणि वॉकेथॉन स्पर्धेला झेंडा दाखवून प्रारंभ केला. यावेळी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडियाच्या संचालिका डॉ. मोनिका घुगे, जिल्हा क्रीडा अधिकारी शेखर पाटील, फिट इंडिया ॲम्बेसेडर व बॉडीबिल्डर विक्रम जाधव तसेच क्रीडा अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने महिला खेळाडू उपस्थित होते. यावेळी (पान २ वर)

## संपादकीय

### युद्धाची जगाला दाह

जगातील सर्वात मोठी महासत्ता असलेली अमेरिका आणि नेहमीच लष्करी संघर्षाच्या तयारीत असलेला इस्रायल यांनी एकमेकांच्या साथीने इराणवर केलेल्या युद्ध हल्ल्यामुळे आधीच होरपळलेल्या जगाला युद्धाचे चटके अधिकच तीव्रतेने जाणवणार आहेत. गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये रशिया आणि युक्रेन यांच्यातील संघर्षाने जगाला हादरवून सोडले होते. त्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील छोटा लष्करी संघर्षही समोर आला होता. इस्रायल आणि पॅलेस्टाइन यांच्यातील लष्करी संघर्ष दीर्घकाळ सुरू आहे. सध्या अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यामध्ये सुद्धा युद्धसदृश परिस्थिती आहे. हे सर्व कमी होते म्हणून की काय आता इस्रायलने इराणवर घातक हल्ले करून जगाला आणखी एका मोठ्या युद्धाच्या उंबरठ्यावर आणून सोडले आहे. अर्थात, अमेरिकेच्या पुढाकाराने आणि सहकार्यानेच इस्रायलने हे हल्ले केले असल्याने या हल्ल्यामागे अमेरिकेचा मेंदू आहे हे उघड आहे. खरे तर एकीकडे इराण आणि अमेरिका यांच्यामध्ये जिनेव्हा येथे शांतता चर्चा सुरू असतानाच अशा प्रकारचे हल्ले करण्यात आले. या चर्चेतून काय निष्पन्न होत आहे याची वाट पाहण्याची तसदीही अमेरिका आणि इस्रायल यांनी घेतली नाही. अर्थात, या दोन्ही देशांना कोणत्या ना कोणत्या कारणाने इराणवर हल्ला करण्याची संधी हवीच होती. गेल्या वर्षीसुद्धा जून महिन्यामध्ये जे बारा दिवसांचे युद्ध झाले तेव्हासुद्धा या दोन देशांनी अशाच प्रकारे संधी मिळताच इराणला टार्गेट केले होते. इराणने आपला आण्विक कार्यक्रम थांबवावा आणि इराणी जनतेने आपले नेते बदलावेत, या मागण्या अमेरिकेने कायम समोर ठेवल्या आहेत. पण इराणने कधीही अमेरिकेच्या या मागणीला महत्त्व दिलेले नाही. गेल्या काही वर्षांमध्ये उलट इराणने आपला आण्विक कार्यक्रम तीव्रतेने राबवला आहे. या कार्यक्रमासाठी लागणाऱ्या युरेनियम या इंधनाचा साठा इराणकडून मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. जरी आम्ही अण्वस्त्र निर्मिती करत नाही, असे इराणने जाहीर केले असले, तरी इस्रायल आणि अमेरिकेचा त्यावर विश्वास नाही. प्रादेशिक शांततेसाठी इराणने आपला आण्विक कार्यक्रम थांबवावा, अशी मागणी सातत्याने या दोन देशांकडून करण्यात येत होती. इराणने या मागणीला महत्त्व न दिल्यानेच योग्य संधी साधून अमेरिका आणि इस्रायल यांनी इराणवर हल्ला केला. या युद्धात इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांचाही बळी गेला असल्याने इराणमध्ये सत्तांतर करण्यासाठी अमेरिकेने युद्धनीती वापरली आहे. अर्थात, ह्या युद्धाचे चटके फक्त या दोन देशांना बसत नाहीत तर इतरही अनेक देशांना होरपळ जाणवणार आहे. अमेरिका नेहमीच लांबवरून युद्ध लढते. अमेरिकेच्या भूमीवर अद्यापपर्यंत युद्ध झाले नसल्याने तेथील जनतेला युद्धाचे चटके जाणवत नाहीत. पण अमेरिकेचे मध्य पूर्व प्रदेशात हवाई आणि नाविक तळ आहेत. त्यावर इराणने हल्ले केल्यामुळे दुबई, जॉर्डन, बहरीन यासारख्या देशांना विनाकारणच या हल्ल्यांचा त्रास होणार आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे इराणवर हल्ला करताना युद्धाचा मूलभूत नियमही इस्रायलने पाळला नाही. तेहरानमधील एका हल्ल्यामध्ये मुलींचे एक महाविद्यालय उद्ध्वस्त झाल्याने अनेक विद्यार्थिनी ठार झाल्या. युद्धामध्ये प्रत्यक्ष भाग घेणारे सैनिक आणि त्यांचे कमांडर यांची प्राणहानी ही समजण्यासारखी असली तरी सर्वसामान्य नागरिकांवर जेव्हा अशा प्रकारचे हल्ले केले जातात तेव्हा युद्धाचा अन्य हेतू आहे की काय? अशी शंका आल्याशिवाय राहत नाही. अमेरिकेला फार पूर्वीपासूनच इराणमध्ये सत्तांतर हवे आहे. त्यांना अशा प्रकारचा संघर्ष गरजेचाच होता.

# आरपीएफने केले १२.८२ लाखांचे ४३ किलो अमली पदार्थ जप्त

प्रतिनिधी । जळगाव

**मध्य रेल्वेच्या रेल्वे संरक्षण दलाने (आरपीएफ) अमली पदार्थांच्या तस्करीविरुद्धच्या मोठी कारवाई केली आहे. आरपीएफने अमली पदार्थांच्या तस्करीच्या सिंडिकेटचा भांडाफोड केला आहे. या कारवाईत १२.८२ लाख रुपये किमतीचे ४३ किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहे.**




नागपूर आरपीएफ पथकाने ६ फेब्रुवारी २०२६ रोजी केलेल्या कारवाईत, ड्रग्ज तस्करीचा भांडाफोड केला आणि ३.७२ लाख रुपये किमतीचे ड्रग्ज जप्त केले. १ निरीक्षक, सहाय्यक उपनिरीक्षक आणि २ आरपीएफ कर्मचाऱ्यांच्या पथकाने नागपूर रेल्वे स्थानकावर देखरेख कर्तव्यादरम्यान, संशयावरून दोन बॅगा घेऊन जाणाऱ्या एका व्यक्तीला ताब्यात घेतले. बॅगांची तपासणी केली असता त्यात २४.८० किलो वजनाचे ९ पॅकेट गांजा आढळून आला. ज्याची अंदाजे किंमत ३.७२ लाख रुपये आहे. चौकशीत, मध्य प्रदेशातील भिंड येथील रहिवासी शाहिद खान हा आरोपी ग्वालियरला पोहोचवण्यासाठी ड्रग्ज पॅकेट घेऊन जात होता. आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे आणि पुढील कारवाईसाठी त्याला नागपूरच्या शासकीय रेल्वे पोलिसांकडे (जीआरपी) सोपवण्यात आले आहे. तर दुसरी कारवाई कलबुरगि आरपीएफ पथकाने दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी जीआरपीच्या समन्वयाने कलबुरगि येथे केली. यात ९.१० लाख रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले.

**➤ आरपीएफ आणि जीआरपी पथकांनी गुप्त माहितीनुसार, कलबुरगि स्थानकावर ट्रेन क्रमांक ११०२० कोणार्क एक्सप्रेसची तपासणी केली. पथकाला कोच बी-१ मध्ये बर्थ क्रमांक ४१ खाली एक बेवारस बॅग आढळली. साक्षीदारांच्या उपस्थितीत योग्य प्रक्रियेनुसार बॅगची तपासणी केली असता त्याच १८.२० किलो वजनाचे १८ बंडल गांजा आढळून आला. जप्त केलेले साहित्य प्रक्रियेनुसार सील करण्यात आले आणि अज्ञात व्यक्तीविरुद्ध वाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे ऑपरेशन मध्य रेल्वे आरपीएफ आणि जीआरपीतर्फे राबविण्यात आले.**

# जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यास जीवे मारण्याची धमकी

## ● कंत्राटी कर्मचाऱ्याविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यास भररस्त्यात शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना उघडकीस आली असून या प्रकरणी जिल्हापेठ पोलीस ठाण्यात कंत्राटी कर्मचाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे जिल्हा परिषद वर्तुळात खळबळ उडाली आहे.**

याबाबत जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. प्रमोद यशवंतराव सोनवणे (वय ४६) यांनी जिल्हापेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. डॉ. सोनवणे हे जळगाव येथे जिल्हा हिवताप अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. संशयित आरोपी मनोज सुभाष पाटील हा जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात कंत्राटी कर्मचारी म्हणून काम करीत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काही काळापूर्वी चाळीसगाव येथे मनोज पाटील याच्याविरुद्ध खातेअंतर्गत चौकशी झाली होती. त्या चौकशीदरम्यान डॉ. सोनवणे यांनी त्याच्या विरोधातील तक्रार अर्जावर सही केल्याचा राग आरोपीच्या मनात होता. याच कारणावरून आरोपीने डॉ. सोनवणे यांना धमकी दिल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीही आरोपीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयात शिरून एका वरिष्ठ महिला अधिकाऱ्यास धमकी दिल्याची घटना घडली होती. त्या प्रकरणातही त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

३ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी सुमारे ४.३० वाजेच्या सुमारास आर.एल. हॉस्पिटलमागील स्वामी समर्थ केंद्राजवळ आरोपी मनोज पाटील याने डॉ. सोनवणे यांना अडवले. तू माझ्याविरोधात तक्रार का केली? तुला बघून घेतो, तुझा गेमच करतो, असे म्हणत त्याने भररस्त्यात शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेनंतर डॉ. सोनवणे यांनी तात्काळ जिल्हापेठ पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. प्राथमिक चौकशीअंती ६ मार्च रोजी आरोपी मनोज पाटील याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## कर्जमाफी शेतकऱ्यांसाठी दमदार पाऊल : आ. भदाणे

प्रतिनिधी । धुळे

महायुती सरकारने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर कर्जमाफी योजना अंतर्गत सप्टेंबर २०२५ पर्यंत थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना दोन लाखापर्यंतचे कर्ज माफ केल्याने कर्जबाजारी शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. त्यांची कर्जातून मुक्तता होण्यासाठी दमदार पाऊल उचलेले आहे. नियमित शेतकऱ्यांनाही पन्नास हजारांची प्रोत्साहन मदत घोषीत केल्याने, या योजनेचे आणि या अर्थसंकल्पाचे सर्वच शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होण्यास सुरुवात झाली आहे, असे मत आमदार राम भदाणे यांनी व्यक्त केले.

# फैजपूर येथे शिवमहापुराण कथेनिमित्त वाहतूक मार्गात बदल

## भुसावळ मार्गावरील १० ते १६ मार्चदरम्यान तात्पुरते रस्ते बंद

प्रतिनिधी । फैजपूर

**फैजपूर परिसरात आयोजित करण्यात आलेल्या पंडित श्री प्रदीपजी मिश्रा यांच्या शिवमहापुराण कथेनिमित्त भुसावळ-फैजपूर मार्गावरील वाहतुकीत तात्पुरते बदल करण्यात आले आहेत. भाविकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती अपेक्षित असल्याने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी जळगाव जिल्हा पोलीस प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.**




महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३३ (१) (बी) अन्वये मंगळवार दि. १० मार्च ते सोमवार दि. १६ मार्च २०२६ या कालावधीत दररोज सकाळी ८ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत वाहतुकीचे नियमन लागू राहणार आहे.

सदर कार्यक्रम फैजपूर पोलीस स्टेशन हद्दीत अकलुद शिवार, गुरुकृपा पेट्रोल पंपाच्या मागे, भुसावळ-फैजपूर रोडवर आयोजित करण्यात आला आहे. त्यामुळे कार्यक्रमस्थळाकडे जाणाऱ्या सर्व रस्ते व उपरस्त्यांवरून वाहनांना तात्पुरता प्रवेश बंद करण्यात येणार आहे.

या आदेशानुसार भुसावळ-फैजपूर रोडवरील हॉटेल रिव्हर पॉईंटपासून भोरटेक फाट्यापर्यंत सर्व प्रकारची वाहतूक बंद राहील. भुसावळकडून फैजपूरकडे जाणारी एस.टी. बस, कार, रिक्षा व दुचाकी वाहतूक अकलुद जुन्या टोल नाक्यापासून यावल मार्गे वळविण्यात येईल. तसेच फैजपूरकडून भुसावळकडे जाणारी वाहतूक यावल टी-पॉईंटमार्गे तापी पुलावरून भुसावळकडे वळविण्यात येणार आहे.

रावेर-सावदा-फैजपूर मार्गे भुसावळकडे जाणारी हलकी वाहतूक बनाना सिटी सावदा येथून हतनूर-बोहर्डी फाटा मार्गे वळविण्यात येईल. मालवाहू अवजड वाहतूक यावल-किनगाव मार्गे जळगाव-भुसावळकडे वळविण्यात येणार आहे. तसेच चोपडा - यावल मार्गे भुसावळकडे जाणारी वाहतूक धानोरा फाटा येथून डांभुर्णी-जळगाव मार्गे वळविण्यात येणार आहे.

दरम्यान, या कालावधीत वाहनचालकांनी वाहतूक बदलाच्या सूचनांचे पालन करून पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी केले आहे.

## पान १ वरुन

**राज्यात कुठेही इंधनाचा......**

यामुळे पेट्रोल पंपांवर विनाकारण मोठमोठ्या रांगा लागल्या. असा कोणताही तुटवडा नाही. केंद्र सरकारनेही हे स्पष्ट केले आहे. भविष्यात जी परिस्थिती उद्भवेल, त्याचा सामना करण्यासाठी भारत सरकार मोदींच्या नेतृत्वा सक्षमपणे भक्कम परिस्थितीत आहे.

**अल्पसंख्याक शाळांची तपासणी......**

इतर शासकीय कायदे आणि नियमांचे पालन याबाबत सखोल चौकशी करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. त्या अनुषंगाने शिक्षण उपसंचालकांनी जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी, पुणे महापालिकेचे प्रशासकीय अधिकारी यांना शहरातील अल्पसंख्याक दर्जाप्राप्त सर्व शाळांची तपासणी करून सविस्तर अहवाल सादर करण्याचा आदेश दिला आहे. अल्पसंख्याक दर्जाचा गैरवापर होऊ नये, तसेच अल्पसंख्याक शाळा स्थापनेचा मूळ उद्देश कायम राहावा, गरीब आणि गरजू विद्यार्थी शिक्षण हक्कापासून वंचित राहू नयेत, या उद्देशाने ५१ टक्क्यांच्या निकषाची शाळांकडून पूर्तता होते की नाही याबाबत तपासणी करण्याची मागणी केली. तपासणी अहवालानंतर दोषी आढळणाऱ्या शाळांवर आवश्यक कारवाई करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे दळवी यांनी सांगितले.

**महागाई वाढणार......**

तोडल्यास मरतो आणि झाड तोडले, तर मरते हा महत्त्वाचा फरक आहे. लाकडाची गरज भागूनही हरित आच्छादन टिकवणे बांबूमुळे शक्य होते'. 'वातावरणातील समतोल राखण्यासाठी ३३ टक्के वृक्ष लागवडीसाठी ३०० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. त्यातून बांबू आणि सागवान लागवड केली जाणार आहे. असे देशात कुठेही होताना दिसत नाही. त्यामुळे राज्याच्या अर्थसंकल्पावर समाधानी आहे. देशाला २ अब्ज बॅरल इंधनाची गरज आहे. देशातील बांबू लागवड वाढल्यास ६ अब्ज बॅरल इंधनाची निर्मिती करता येऊ शकते. आपल्या गरजेचे इंधन वापरून चार अब्ज बॅरल जगाला देऊ शकतो. देशाच्या पंतप्रधानांनी अन्नदाता शेतकरी आता ऊर्जादाता होत असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे अर्थसंकल्पात मोठ्या प्रमाणात तरतुदी, घोषणा झाल्या आहेत,' असेही पटेल यांनी सांगितले.

**नाशिकचा जीएसटी अधिकारी......**

सोमनाथ दत्तू पागे आणि सहायक राज्यकर आयुक्त मच्छिंद्र विठ्ठल दोंदे यांनी तक्रारदाराच्या कार्यालयातील तपासणी पूर्ण करण्यासाठी सव्वा कोटी रुपयांची मागणी केली होती. तडजोडीअंती एक कोटी रुपये देण्याचे ठरले आणि त्याचा पहिला हप्ता म्हणून २० लाख रुपये स्वीकारताना अमित हिरामण जाधव या खासगी व्यक्तीला मुंबई एसीबीचे सहायक पोलिस आयुक्त विजय चव्हाण यांच्या पथकाने ताब्यात घेतले. तक्रार प्राप्त झाल्यानंतर पाच दिवसांत मुंबईच्या पथकाने ही कारवाई केली. या कारवाईनंतर कार्यालयीन झडतीमध्ये दोन लाख रुपये जप्त करण्यात आले आहेत. संशयितांचे मोबाइल, दुचाकी आणि कार असा मुद्देमाल ताब्यात आहे. मात्र, या जप्तीचे सविस्तर विवरण आणि घरझडतीचा ठोस तपशील देण्यास नाशिक ङ्गएसीबीफ्ने असमर्थता दर्शविली आहे. तक्रारदार स्थानिक विभागाकडे न जाता थेट मुंबईला का जात आहेत, अशी कुजबुज पोलिस दलात ऐकू येत आहे.

**महिलांनी क्रीडा क्षेत्रात ......**

बोलताना मंत्री खडसे म्हणाल्या की, देशाला २०३६ पर्यंत विकसित भारत बनविण्याचे उद्दिष्ट आहे. तंत्रज्ञानासोबतच नागरिकांनी शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहणेही तितकेच महत्त्वाचे आहे. युवा पिढीने स्वतःच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असून विविध खेळांच्या माध्यमातून युवक-युवतींना निरोगी ठेवता येते. तंदुरुस्त युवा पिढीमुळे देश विविध क्षेत्रात प्रगती करू शकतो. क्रिकेटसह इतर अनेक खेळांमध्येही उज्ज्वल भविष्य असून पालकांनी मुलांना विविध खेळांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. 'खेलो इंडिया' उपक्रमांतर्गत महिला दिनाचे औचित्य साधून देशभरातील जिल्ह्यांमध्ये 'अस्मिता लीग'चे आयोजन करण्यात येत आहे. या माध्यमातून महिलांना विविध क्रीडा प्रकारांमध्ये खेळण्याची संधी उपलब्ध होणार आहे. क्रीडा क्षेत्रात खेळाडू म्हणूनच नव्हे तर प्रशिक्षक, व्यवस्थापन आणि इतर अनेक करिअरच्या संधीही उपलब्ध आहेत. ग्रामीण भागातील खेळाडूंनाही अधिक संधी मिळाव्यात, यासाठी शासन विविध सुविधा उपलब्ध करून देत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रीय स्तरावर क्रीडा प्रकारात यश संपादन करणाऱ्या मुलींचा मंत्री खडसे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी जिल्ह्यातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी क्रीडा क्षेत्रात विविध सेवा व सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे सांगितले. स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडियाच्या संचालिका डॉ. मोनिका घुगे यांनी महिलांनी क्रीडा क्षेत्रात पुढे यावे यासाठी संस्था मोठ्या प्रमाणात प्रयत्न करत असल्याचे नमूद केले.

## विविध मागण्या मान्य न झाल्यास पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचे राज्यव्यापी आंदोलन तीव्र करणार

प्रतिनिधी । नंदुरबार

**येथील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी राज्यव्यापी आंदोलन करण्यात येणार आहे. याबाबत अप्पर जिल्हाधिकारी धनजंय गोगटे यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले.**

या निवेदनात म्हटले आहे की, पशुवैद्यकीय चिकित्सालयांचे वेळापत्रक पूर्वीप्रमाणे सकाळी ९ ते ४.३० करण्यात यावे. २४ तास पशुवैद्यकीय सेवेसाठी शिफ्टप्रमाणे आवश्यक संख्येनुसार पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची तातडीने भरती करावी. पशुवैद्यकीय अधिकारी यांचे वर्षानुवर्षे प्रलंबित परिविक्षाधीन कालावधी समाप्त करणे, राज्यातील वैद्यकीय अधिकारी यांच्या संवर्गाप्रमाणे पशुसंवर्धन विभागातील समकक्ष पदांचे वेतन सुधारीत करावे.

वैद्यकीय अधिकारी यांच्याप्रमाणे व्यवसाय रोध भत्ता तातडीने देण्यात यावा आश्वासित प्रगती योजनेतील २५ टक्के निवडश्रेणी अट रद्द करावी. पात्र सर्व अधिकाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा १०, २० व ३० वर्षांच्या सेवेनंतर लाभ सरसकट देण्यात यावा, या मागणीनुसार चिकित्सालयांना औषधी पुरवठा करणे या मागण्या करण्यात याव्यात अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# महिला शक्तीचा गौरव करणारा दिवस : डॉ. विलास नारखेडे

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील खेळाडू महिलांच्या आरोग्य सक्षमीकरण आणि क्रीडा प्रगतीसाठी विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार बहिणाबाई विद्यालय तसेच अर्पण सेवा ट्रस्ट यांच्यामार्फत डॉ. विलास नारखेडे यांनी या उपक्रमात व्यक्त केला.**




यंदाचा महिला दिन सामाजिक जागरूकता आणि महिला सन्मानाचा संदेश देणारा ठरला असल्याचे डॉ. नारखेडे यांनी सांगितले. महिला दिनानिमित्त विद्यालयात आयोजित खेळाडू मीनल महाले, रागिनी चव्हाण, भैरवी निवतकर आदी महिलांचा गुलाब पुष्प, टी-शर्ट व खाऊ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच विद्यालयातील प्रतिभा खडके ,स्वाती कोल्हे,सीमा चौधरी, भाविका चौधरी, तडवी, रेखा पाटील व इतरही शिक्षकांचा यावेळी मुख्याध्यापक डॉ.विलास नारखेडे यांच्या हस्ते गौरव व सन्मान करण्यात आला. याप्रसंगी विविध शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# सामाजिक कायद्यामुळेच समाज नियंत्रीत आहे : न्यायमूर्ती शुक्रे

प्रतिनिधी । जळगाव

**येथील धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी संचलित लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय आणि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स (मासवे) यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ व ९ मार्च रोजी दोन दिवसीय बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन कार्यक्रम झाला.**




शाश्वत आणि समावेशी विकास साध्य करण्यात कायद्याची भूमिका असा आहे. उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष माजी आ.शिरीष चौधरी, कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष माजी न्यायमूर्ती सुनिल शुक्रे, प्रमुख अतिथी म्हणून मधुकर कुऱ्हाडे (प्राचार्य,डी टी एस एस कॉलेज ऑफ लॉ, मालाड, मुंबई), महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य आणि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्सचे संस्थापक व कार्यकारी अध्यक्ष अंबादास मोहिते, संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ.पी.आर.चौधरी, चेतना महाविद्यालय मुंबई येथील प्राचार्य डॉ. संजय जगताप, केसीई सोसायटीचे विधी महाविद्यालयाचे प्राचार्य युवा कुमार रेड्डी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राकेश चौधरी मासवे संघटनेची सचिव संजय कुलकर, प्राचार्य डॉक्टर विष्णू गुंजाळ आमच्यावर उपस्थित होते. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.राकेश चौधरी यांनी शाश्वत विकासाच्या ध्येयांवर चर्चा करत असताना त्यामध्ये सामाजिक कायद्यांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे सांगत नवप्रगत समाज विकासासाठी काही नवीन सामाजिक कायदे देखील गरजेचे आहेत आणि त्यानुसार त्यावर राष्ट्रीय स्तरावर चर्चा होणं हे महत्त्वपूर्ण असल्याने आजच्या दोन दिवसीय कार्यशाळेचा विषय आम्ही हा निश्चित केलेला आहे. या विषयाला अनुसरून संबंध भारतातून ८१ संशोधकांनी त्यांचा शोधनिबंध सादर केलेला आहे आणि याचे वाचन या दोन दिवसांमध्ये या ठिकाणी होणार आहे. या दोन दिवसीय चर्चासत्रामध्ये मधुकर कुराडे न्यायमूर्ती सुनील सुक्रे मासवे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अंबादास मोहिते हे मान्यवर देखील आपल्याला सर्व समावेशक विकास सामाजिक कायदे या विषयावर मार्गदर्शन करतील. आजच्या या दोन दिवसीय चर्चासत्रात समाज विकासासाठी सामाजिक कायद्यांची महत्त्वपूर्णता योग्यता आणि उपयुक्तता यावर सांगोपांग चर्चा या ठिकाणी घडणार आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# एक स्त्री सक्षम होते, तेव्हा संपूर्ण कुटुंब; पर्यायाने समाज प्रगत होतो : महापौर

## महानगरपालिकेतर्फे महिला दिनानिमित्त उपक्रम : सर्वोत्कृष्ट महिला कर्मचाऱ्यांसह शिष्यवृत्तीधारक, गुणवंतांचा सत्कार

प्रतिनिधी । जळगाव

**जळगावच्या प्रत्येक महिलेमध्ये एक उपजत नेतृत्वशक्ती आहे. महिलांनी आपले मानसिक आरोग्य सक्षम ठेवणे खूप महत्त्वाचे आहे. त्याच्यासाठी दररोज योगा, व्यायाम, पायी चालणे यापैकी एकाला तरी प्राधान्य द्यावे. जेव्हा एक स्त्री सक्षम होते, तेव्हा संपूर्ण कुटुंब आणि पर्यायाने समाज प्रगत होतो. स्वतःच्या आरोग्याची आणि स्वाभिमानाची जपणूक करा, कारण तुम्ही सक्षम असाल तरच घर आणि शहर सक्षम होईल, असे प्रतिपादन महापौर दीपमाला काळे यांनी केले.**




जळगाव शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन इमारतीच्या प्रांगणात करण्यात आले होते. या वेळेला प्रमुख पाहुणे म्हणून महापौर दीपमाला काळे, उपमहापौर मनोज चौधरी, स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील, महिला व बालकल्याण समिती सभापती सिंधुताई कोल्हे, समितीचे सदस्य विद्या सोनवणे, रंजना वानखेडे, पूजा जगताप, डॉ. अमृता सोनवणे, अतिरिक्त आयुक्त शोभा बाविस्कर, उपायुक्त निर्मला गायकवाड, उपायुक्त धनश्री शिंदे उपस्थित होते. प्रस्तावनेमधून निर्मला गायकवाड यांनी जागतिक महिलादिनाविषयी घेण्यात आलेल्या उपक्रमाविषयी सविस्तर माहिती देऊन कार्यक्रम घेण्यामागील उद्देश विशद केला. यावेळी ३ बचत गटांना कर्जाचे धनादेश देऊन मान्यवरांकडून व्यवसायासाठी प्रोत्साहित करण्यात आले. यानंतर महानगरपालिकेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांनादेखील सन्मानित करण्यात आले. तसेच इयत्ता दहावी, बारावी व पदवी परीक्षामध्ये यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना देखील ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. प्रसंगी महापौर दीपमाला काळे यांनी जागतिक महिला दिनानिमित्त महिलांना संबोधित केले. महिलांनी केवळ घरापुरते मर्यादित न राहता प्रशासकीय आणि सामाजिक कामात आपला सहभाग वाढवावा. घरातील आरोग्य जपण्यासोबतच स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका आणि मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य द्या, असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला. महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी स्थायी समिती सदस्य वंदना इंगळे, नगरसेवक पियुष कोल्हे, उज्ज्वला बाविस्कर, जयश्री पाटील, अंकिता पाटील, वैशाली पाटील, कविता शिवदे, प्रतीक्षा सोनवणे, माधुरी बारी, संगीता दांडेकर, कविता पाटील आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सरिता खाचणे यांनी केले तर आभार महिला अधिकारी गायत्री पाटील यांनी मानले.

### ➤ महिलांना कर्करोगाविषयी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन

दुपारच्या सत्रात डॉ. ऋचा नवाल यांनी स्तनांचा कर्करोग याविषयी तर डॉ.अंजली भिरुड यांनी गर्भाशयाचा कर्करोग याविषयी उपस्थित महिला भगिनींना सविस्तर माहिती देऊन लक्षणे दिसल्यास तपासणी करण्याचे आवाहन केले. यानंतर महिलांसाठी विविध खेळ घेण्यात आले. यामध्ये महिला-भगिनींनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन जागतिक महिला दिनाचा दिवस प्रफुल्लित केला. खेळांमध्ये विजेता ठरलेल्या महिलांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

---

## थोडक्यात

### विद्यार्थिनींसाठी रोटरी वेस्टतर्फे प्रसाधनगृहाचे लोकार्पण

**जळगाव ।** येथील रोटरी क्लब ऑफ जळगाव वेस्टतर्फे महिला दिनाच्या पूर्वसंध्येला भाऊसाहेब राऊत विद्यालयातील विद्यार्थिनींसाठी प्रसाधनगृहाचे खा. स्मिता वाघ व रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर इलेक्ट डॉ. राजेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले. राऊत विद्यालयातील विद्यार्थिनींच्या आरोग्य व सुरक्षिततेच्या दृष्टीने रोटरी वेस्टने या प्रसाधनगृहाचे नूतनीकरण केल्याची माहिती अध्यक्ष गौरव सफळे यांनी दिली. यावेळी महेश सोनी, देवेश कोठारी, अनिल कांकरिया, योगेश भोळे, ॲड. सुरज जहांगीर, कृष्णकुमार वाणी, सुनील सुखवानी, सरिता खाचणे तसेच तुषार तोतला, अमित चांदीवाल यांची उपस्थिती होती.

### सुनसगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त कीर्तन

**भुसावळ ।** तालुक्यातील सुनसगाव येथे सालाबादप्रमाणे यंदाही किर्तनाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज जयंती भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. गेल्या पाच वर्षांपासून गावात कोणत्याही प्रकारची मिरवणूक न काढता किर्तनाच्या माध्यमातून जनजागृती करण्याची परंपरा जपली जात असून, महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत तरुण पिढीला प्रेरणा देण्याचा उपक्रम राबविला जात आहे. यावेळी ह.भ.प. निवृत्ती महाराज शिरसोलीकर यांचे जाहीर किर्तन आयोजित करण्यात आले होते. आपल्या ओजस्वी आणि प्रभावी शैलीत त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, स्वराज्य स्थापनेची जिद्द, तसेच आदर्श प्रशासन व्यवस्था यांचा वेध घेत उपस्थितांना प्रेरित केले.

---

# उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी संशोधन, सक्षम नेतृत्व काळाची गरज : मंत्री रक्षा खडसे यांचे मत

प्रतिनिधी । जळगाव

**उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी मूलभूत संशोधन, सक्षम नेतृत्व आणि सुशासन ही काळाची गरज आहे, असे मत क्रीडा राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांनी केले.**



खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी (के.सी.ई.) संचलित अब्दुल कलाम स्कील डेव्हलपमेंट सेंटरतर्फे, एम.जे. कॉलेज मधील सोहम हॉल येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला प्रमुख वक्त्या म्हणून त्या बोलत होत्या. या उपक्रमांतर्गत केसीई संस्थेतील सहा महाविद्यालयांमधील प्राध्यापकांसाठी उच्च शिक्षणातील नेतृत्व, संशोधन आणि प्रशासन या विषयावर आधारित तीन दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून क्रीडा राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांची उपस्थिती लाभली हाती..

या प्रसंगी शैक्षणिक संचालक डॉ. मृणालिनी फडणवीस, नागपूर येथील जेष्ठ संशोधक डॉ. रेखा शर्मा, विद्यापिठातील स्कूल ऑफ केमिकल सायन्सचे संचालक डॉ.डि.एस.दलाल, गव्हर्न्मेंट इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ.सुहास गाजरे, करिअर कट्टा संचालक डॉ.शमा सराफ, डॉ.विजेता सिंग, डॉ. ज्योती भोळे यांची प्रमुख तज्ञ संसाधन व्यक्ती म्हणून उपस्थिती होती.

या कार्यशाळेच्या माध्यमातून प्राध्यापक वर्गाला बदलत्या शैक्षणिक धोरणानुरुप नेतृत्व, संशोधन आणि प्रशासन याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमात सर्व तज्ञ संसाधन व्याख्याते यांनी उच्च शिक्षणातील नेतृत्वाचे महत्त्व, संशोधनाची नवीन दिशा आणि संधी, नवीन धोरणानुसार शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी आवश्यक उपाययोजना यासंबंधी विविध पैलूंवर सखोल चर्चा केली. संस्थेचे अध्यक्ष प्रज्ञावंत नंदकुमार बेंडाळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राममध्ये शैक्षणिक संचालक डॉ. मृणालिनी फडणवीस, डॉ शमा सराफ, डॉ ज्योती भोळे, डॉ. विजेता सिंग, डॉ. भावना मानेकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

---

### महाराणा प्रताप विद्यालयात महिला दिन

प्रतिनिधी । जळगाव

पूर्व खान्देश हिंदी शिक्षण संस्था संचलित महाराणा प्रताप माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, प्रेमनगर, जळगाव येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे पर्यवेक्षक सी. एस. चौधरी होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय चौधरी, संजय पाटील उपस्थित होते.

---

# महामंडळाच्या कर्जाची थकबाकी वसुलीसाठी विशेष अभियान

प्रतिनिधी । जळगाव

**साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्यादित) मार्फत समाजातील गरजू घटकांच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध कर्ज योजना राबविल्या जात असून मोठ्या प्रमाणावर कर्ज वितरण करण्यात आले आहे. मात्र अनेक लाभधारकांकडून कर्जाची नियमित परतफेड होत नसल्यामुळे नवीन कर्ज प्रस्ताव मंजूर करताना अडचणी निर्माण होत असल्याची माहिती जिल्हा व्यवस्थापक गोकुलदास पगारे यांनी दिली.**

महामंडळाची आर्थिक स्थिती मजबूत राहण्यासाठी व नवीन लाभधारकांना कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी थकीत कर्जाची वसुली करणे आवश्यक असल्याने विशेष वसुली अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत थकीत कर्जदारांना वसुली नोटीस देणे, कर्जदार व जामीनदारांच्या घरी भेट देणे, अंतिम नोटीस पाठविण्यात येणार आहेत. तसेच दिलेले धनादेश बँकेत जमा केल्यानंतर ते परत आल्यास कन्जुमर ॲक्ट कलम १३८ अ नुसार कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचेही महामंडळाने स्पष्ट केले आहे.

---

# भारत मुक्ती मोर्चातर्फे विविध मागण्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी । जळगाव

केंद्र शासनाने ओबीसींची जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय कॅबिनेटमध्ये झालेला आहे. ओबीसींच्या जातींचा कॉलम वाढविण्यात यावा, यासह विविध मागण्यांचे निवेदन भारत मुक्ती मोर्चा व राष्ट्रीय पिछडा ओबीसी मोर्चा जळगाव जिल्हा शाखेतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना दिले.



भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम व राष्ट्रीय पिछडा ओबीसी मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष चौधरी विकास पटेल यांनी ओबीसी जातिनिहाय जनगणना, युजीसी इक्विटी रेग्युलेशन व शिक्षक पात्रता परिक्षा या संदर्भात संपुर्ण भारतात चार चरणात आंदोलन घोषित केले आहे.

यापैकी पहिल्या चरणांतर्गत अप्पर जिल्हाधिकारी जळगाव यांना भारत मुक्ती मोर्चा व राष्ट्रीय पिछडा ओबीसी मोर्चाच्या पदाधिकारी यांनी निवेदन दिले.

यावेळी भारत मुक्ती मोर्चा जिल्हा अध्यक्ष देवानंद निकम व राष्ट्रीय ओबीसी राज्य सदस्य घनश्याम चौधरी यांनी नेतृत्व केले. राजकुमार गवळी, खुशाल चव्हाण, किशोर सुर्यवंशी, डॉ.सुभाष राणे, यु.डी.चौधरी, दिनकर चौधरी, वसंत कोलते, अमोल कोल्हे, शशिकांत हिंगोणेकर, संतोष साळवे, विजय निकम, सुमित्र अहिरे, सुनिल देहडे, खुशाल सोनवणे, अशोक सोनवणे, शालीग्राम सोनवणे, चंद्रशेखर अहिरराव, सिध्दार्थ नेतकर, रविंद्र मोरे, दिलीप जाधव, दिलीप इंगळे, देविदास पारधे, रमेश थाटे, भीमराव नन्नवरे आदी उपस्थित होते.

---

# पोलीस अधीक्षक कार्यालयात 'भरोसा सेल व समुपदेशन केंद्र' इमारतीचे भूमिपूजन

प्रतिनिधी । जळगाव

**महिला व बालकांच्या सुरक्षिततेसाठी तसेच तक्रार निवारणासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या भरोसा सेल व समुपदेशन केंद्र या नव्या इमारतीचे भूमिपूजन रविवारी (दि.८) जळगाव पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या परिसरात उत्साहात पार पडले. जिल्ह्याचे पालकमंत्री तथा पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्या हस्ते हा सोहळा संपन्न झाला.**



कार्यक्रमाच्या प्रारंभी पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी प्रास्ताविक करत या केंद्राच्या उभारणीमागील उद्देश स्पष्ट केला. महिला व बालकांना सुरक्षित वातावरणात तक्रार नोंदविण्याची सुविधा मिळावी, तसेच त्यांना कायदेशीर मदत आणि मानसिक समुपदेशन एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावे, यासाठी हे केंद्र उभारण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जळगाव उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांनी केले.

याप्रसंगी अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, पोलीस निरीक्षक सतीश गोराडे (जिल्हा विशेष शाखा), पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड (स्थानिक गुन्हे शाखा) यांच्यासह शहरातील विविध पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी व पोलीस कर्मचारी उपस्थित होते. उभारण्यात येणारे भरोसा सेल व समुपदेशन केंद्र हे अत्याधुनिक सुविधा असलेले केंद्र असेल. पीडित महिला व बालकांना येथे कायदेशीर मार्गदर्शन, मानसिक समुपदेशन, तक्रार नोंदणी आणि पोलीस मदत एकाच छताखाली उपलब्ध होणार आहे. त्यामुळे तक्रारदारांना अधिक विश्वासाने पुढे येण्यासाठी मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

या प्रकल्पासाठी जिल्हा नियोजन समिती निधीतून सुमारे २९७ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली आहे.

---

# जळगावात गावठी पिस्टल तस्करीचा पर्दाफाश



प्रतिनिधी । जळगाव

## ७ आरोपी अटकेत, ८ पिस्टल, १० जिवंत काडतुसे जप्त

**जिल्हापेठ पोलीस ठाण्याच्या पथकाने अवैध शस्त्र तस्करीवर मोठी कारवाई करत सात आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून ८ गावठी पिस्टल, १० जिवंत काडतुसे आणि एक दुचाकी असा सुमारे ३ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.**

जिल्हापेठ पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम १९५९ च्या कलम ३.२५ अन्वये CCTNS क्रमांक ४४/२०२६ असा गुन्हा १ मार्च २०२६ रोजी दाखल करण्यात आला. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे यश रामदास नन्नवरे (वय २७, रा. धनगर बिल्डिंग, इंडिया गॅरेजजवळ, जळगाव) याला भजी गल्ली परिसरातून ताब्यात घेण्यात आले. त्याच्या झडतीत एक गावठी पिस्टल आढळून आल्याने त्याला अटक करण्यात आली. पोलिसांच्या चौकशीत या प्रकरणातील इतर आरोपींची नावे उघडकीस आली. त्यानुसार केशव सुनील भालेराव (रा. वरणगाव), गौरव देविदास साळवे (रा. पिंप्राळा, जळगाव), समाधान बळीराम निकम (रा. अंजाळे, ता. यावल), विकास प्रकाश काकडे (रा. साळसिंगो, ता. बोदवड), जगदीश गजानन महाजन (रा. बंबाळा फाटा, शाहपूर, जि. बुरहानपूर, म.प्र.) आणि कैलास राजेंद्र माळी (रा. बोरकुंड, जि. धुळे) यांना अटक करण्यात आली. चौकशीत मुख्य आरोपी समाधान निकम हा मध्यप्रदेशातून गावठी पिस्टल आणून जिल्ह्यात विक्री करत असल्याचे निष्पन्न झाले. त्याने ११ पिस्टल व काडतुसे विक्री केल्याची कबुली दिली आहे. अटकेत असलेल्या आरोपींपैकी तिघांवर यापूर्वीही गंभीर गुन्हे दाखल असून समाधान निकम हा खुनाचा प्रयत्न व आर्म ॲक्टच्या गुन्ह्यातही पाहिजे आरोपी आहे. ही कारवाई पथकाने केली. पुढील तपास गोपाल देशमुख करीत आहेत.

---

# सर्वसामान्यांसाठी पुन्हा एकदा महागाईचा धक्का

प्रतिनिधी । जळगाव

**देशभरात एलपीजी गॅस सिलिंडरच्या किमतीत वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांसाठी पुन्हा एकदा महागाईचा धक्का बसला आहे.**



## गॅस सिलिंडरच्या किमतीत वाढ

सरकारी तेल कंपन्यांनी १४.२ किलोच्या घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किमतीत ६० रुपयांची वाढ केली आहे. तर १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरच्या किमतीत ११५ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. नवीन दर आज म्हणजेच ७ मार्चपासून लागू झाले आहेत. या वाढीचा थेट परिणाम घरगुती ग्राहकांसह हॉटेल, रेस्टॉरंट आणि व्यावसायिक आस्थापनांवर होणार आहे. जळगावमध्ये यापूर्वी ८५८.५० रुपयांना मिळणारा घरगुती गॅस सिलिंडर आता ९१८.५० रुपयांना मिळणार आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या घरखर्चावर पुन्हा ताण वाढणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. देशाची राजधानी दिल्लीमध्येही घरगुती एलपीजी सिलिंडरची किंमत ८५३ रुपयांवरून वाढून ९१३ रुपये झाली आहे. तर व्यावसायिक सिलिंडरची किंमत १,७६४ रुपयांवरून वाढून १,८८३ रुपये झाली आहे. घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किमतीत याआधी ८ एप्रिल २०२५ रोजी ५० रुपयांची वाढ करण्यात आली होती. त्यानंतर दीर्घकाळ दर स्थिर होते. मात्र आता पुन्हा एकदा दरवाढ झाल्याने ग्राहकांच्या खिशावर कात्री लागणार आहे. दरम्यान, व्यावसायिक एलपीजी सिलिंडरची किंमत गेल्या महिन्यात १ फेब्रुवारी रोजी ५० रुपयांनी वाढवण्यात आली होती. अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्चे तेल आणि गॅसच्या किमतींबाबत अनिश्चितता वाढली आहे.

अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांनंतर जागतिक ऊर्जा बाजारात मोठी हालचाल दिसून येत आहे. त्याचा परिणाम भारतातील एलपीजीच्या किमतींवरही झाल्याचे मानले जात आहे. सरकारी आकडेवारीनुसार, भारत आपल्या एलपीजीच्या गरजांचा मोठा हिस्सा आयातीद्वारे पूर्ण करतो. गेल्या आर्थिक वर्षात देशात सुमारे ३१.३ दशलक्ष टन एलपीजीचा वापर झाला होता. त्यापैकी फक्त १२.८ दशलक्ष टन एलपीजी देशांतर्गत उत्पादनातून उपलब्ध झाले.

उर्वरित गरज भागवण्यासाठी भारताला आखाती देशांसह इतर आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमधून गॅस आयात करावा लागतो. यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात किमती वाढल्यास त्याचा परिणाम भारतातील गॅसच्या दरांवर होण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. तसेच येत्या काळात पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीतही वाढ होण्याची शक्यता आहे.

---

### पहूर येथे तुकाराम बीज उत्साहात साजरी

प्रतिनिधी । जामनेर

जगद्गुरु संत तुकाराम महाराज हे वैराग्याचे महामेरू होते. त्यांनी जगाच्या कल्याणासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग केला, असे प्रतिपादन हरिभक्त परायण मुकुंदा महाराज यांनी केले. ते संत तुकाराम महाराज बीजनिमित्त आयोजित कीर्तन उत्सवात बोलत होते. पहूर येथे दरवर्षीप्रमाणे विठ्ठल जाधव यांच्या पुढाकाराने तुकाराम बीज उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी संत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून पूजन करण्यात आले. यानंतर ह.भ.प. मुकुंदा महाराज यांच्या कीर्तनातून संत तुकाराम महाराजांचे जीवन, त्यांचे वैराग्य,समाजप्रबोधनाचे कार्य यावर प्रकाश टाकण्यात आला.

# वारंवार वीजपुरवठा खंडित; उद्योजकांचे कोट्यवधींचे नुकसान

## समस्या लवकरच सोडवणार : ना. गुलाबराव पाटील

प्रतिनिधी । जळगाव

**तालुक्यातील उमाळा–नशिराबाद परिसरात विविध औद्योगिक कंपन्या कार्यरत आहेत. या सर्व कंपन्या नियमितपणे लाखो रुपयांची वीजबिले भरत असतानाही वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने उद्योजकांना कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. त्यामुळे कर्जफेड व कामगारांचे पगार कसे करावेत, या चिंतेत कंपनीचे मालक आहेत. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी जळगाव ग्रामीण इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष सचिन लढ्ढा यांनी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या निवासस्थानी भेट घेऊन उद्योजकांची व्यथा मांडली.**

त्यानंतर ही समस्या लवकरच सोडविण्यात येईल, असे आश्वासन ना. गुलाबराव पाटील यांनी दिले. यावेळी राजीव बियाणी, हरीश जोशी, मुकेश दहाड, ललित लढ्ढा, तुषार पाटील, गजेंद्र मराठे, नरेश बागडे आदी उद्योजक उपस्थित होते.



उमाळा येथील कंपन्यांनी वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडितमुळे झालेल्या नुकसानीबाबत महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांना अनेक वेळा निवेदन दिले. मात्र त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे उद्योजकांनी सांगितले. यावेळी ना. गुलाबराव पाटील म्हणाले की, ही समस्या तातडीने सोडवून चिंचोली उपकेंद्रातून वीजपुरवठा सुरळीत केला जाईल. तसेच ५ केव्ही क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बसविण्यात येणार असल्याने वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण कमी होईल आणि कंपन्यांचे नुकसान टळेल.

### उद्योजकांकडून ना. गुलाबराव पाटील यांचे आभार

उमाळा–नशिराबाद परिसरातील कंपन्यांसाठी चिंचोली येथील महावितरण उपकेंद्रात ३२ केव्ही ट्रान्सफॉर्मरसाठी निधी मंजूर करून काम सुरू करण्यात आले होते. आता पुन्हा ५ केव्हीचा ट्रान्सफॉर्मर बसविण्यात येणार असल्याने वारंवार होणारे ट्रिपिंग थांबेल व उद्योजकांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान टळेल. त्यामुळे उद्योजकांनी ना. गुलाबराव पाटील यांचे आभार मानले.

## उन्हाळ्याची चाहूल लागताच बाजारात रसदार फळांचे आगमन

प्रतिनिधी । भडगाव

गेल्या आठवडाभरापासून उन्हाळ्याची चाहूल लागून उन्हाचे चटके व दिवसा उष्ण वातावरण तापू व जाणू लागल्याने बाजारपेठत गोड रसदार, औषधी गुणधर्मयुक्त फळाचे बाजारपेठेत आगमन झाले असून.

निसर्ग चक्रऋतू प्रमाणे वर्षातील चार, चार महिन्याचा एक ऋतू प्रमाणे तीन ऋतू असतात त्या प्रमाणे फेब्रुवारी ते मे चार महिने उन्हाळा ऋतूत, वंसत व ग्रीष्म ऋतूचा कालीवधी असतो.

प्रत्येक ऋतूत वेगवेगळे फळे देत असतो त्याप्रमाणे उन्हाळा ऋतूची चाहुल लागताच बाजारपेठत रसदार गोड फळांचे आगमन होताच बाजारपेठेत टरबूज, खरबुज, द्राक्षे, नारळपाणी, चिकू, संत्रा, मोसमी, काकडी, खीरे, आदी रसदार पौष्टिक फळाबरोबर ऊसाचा ताजा रस, चिंचेचे पाणी, लिंबूचे सरबत, कैरी सरबत, पन्हे उन्हाळा ऋतू बरोबर आगमण झाले आहे म्हणून अनेकजण या रसदार फळांचा आस्वाद घेऊन आपल्या शारीरातील झीज व पाण्याची पातळी भरून काढतात निसर्ग देवता प्रत्येक ऋतूत मानवाला व प्राण्यांना काहीना काही भरभरून देत असतो म्हणून निसर्ग हा सर्वाचा मित्र असून तो वरदान ठरला आहे.

## गोराडखेडा जि. प. प्राथमिक शाळेत शिष्यवृत्ती सराव परीक्षेचे आयोजन



प्रतिनिधी । पाचोरा

**तालुक्यातील गोराडखेडा जि.प. शाळा येथे १ ऑगस्ट २०२५ पासून शिष्यवृत्ती तासिकांचे आयोजन करण्यात आले आहे.**

ग्रामीण भागातील विद्यार्थी हुशार असून सुद्धा त्यांना खाजगी शिकवणी तसेच योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याने स्पर्धा परीक्षांमध्ये हे विद्यार्थी मागे पडताना दिसतात.

काही पालकांची इच्छा असून सुद्धा ते शहराच्या ठिकाणी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी पाठवू शकत नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा स्कॉलरशिप तसेच इतर स्पर्धा परीक्षेमध्ये सहभाग नगण्य असल्याचे दिसते. गोराडखेडा जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांनी परीक्षेमध्ये सहभाग घेण्याचे आवाहन करत शाळेमार्फत विद्यार्थ्यांची तयारी करून घेण्याचे आश्वासन शाळेतील शिक्षकांच्या वतीने देण्यात आले. याकामी शाळेतील पदवीधर शिक्षक हरिश्चंद्र मुंडे आणि गौरव येवले सर मार्गदर्शन करत आहेत.

या विद्यार्थ्यांसाठी दररोज सकाळी १०:३० ते ११:३० या वेळेत अतिरिक्त तासिका घेऊन अध्यापन करण्यात येत आहे. तसेच प्रश्नपत्रिका सराव घेण्यात येत आहे.

यात इयत्ता चौथी, पाचवी आणि सातवी वर्गातील सर्व विद्यार्थी तसेच इतर वर्गातील इच्छुक विद्यार्थी या तासिकेत उत्स्फूर्त सहभागी होत आहेत. शिक्षकांमार्फत सुरू असलेल्या स्तुत्य उपक्रमास शालेय समितीचे पदाधिकाऱ्यांनी भेट दिली. यावेळी शालेय समितीचे अध्यक्ष माधवराव पाटील, उपाध्यक्ष रवींद्र पाटील, सदस्य मनोज पाटील , ज्ञानेश्वर अहिरे आदींनी शिक्षकांचे अभिनंदन करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

## थोडक्यात

### महात्मा गांधी विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन

**भुसावळ ।** तालुक्यातील वरणगाव येथील महात्मा गांधी विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात नवजीवन माध्यमिक विद्यालय, पाचोरा येथील विज्ञान शिक्षक रवींद्र चौधरी यांनी विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन स्विकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाची सुरुवात सी.व्ही. रमन यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. विज्ञान शिक्षक सुनील वानखेडे यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व स्पष्ट करताना विज्ञाननिष्ठ समाज घडविण्याची गरज अधोरेखित केली आहे.

## विटनेर प्राथमिक शाळेत बाल आनंद मेळाव्याचे आयोजन

प्रतिनिधी । घोडगाव



**येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा विटनेर येथे नुकतेच बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. आनंदमेळाव्याचे चे उद्घाटन सरपंच कविता मंगल पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.**

मुख्याध्यापक हेमंत भामरे, विकास पाटील, मनीषा पाटील, प्रवीण पाटील व हेमंत पाटील यांनी मेळाव्याचे नियोजन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थ व वस्तूंचे स्टॉल लावले. मकमवा व शिकाफ संकल्पनेतून व्यवहारज्ञान, उद्योजकता आणि आत्मविश्वास विद्यार्थ्यांना मिळाला. नफा, तोटा, व्यावहारिक ज्ञान, संवाद कौशल्य इत्यादी गुणांची माहिती करून देण्यात आली.

या मेळाव्याच्या माध्यमातून प्रगती रवींद्र कोळी हिच्या फेसबुक पाणी पुरी या स्टॉल चा प्रथम क्रमांक आला तिने एकूण ३७० रुपयाचा व्यवसाय करत २१० रुपये नफा मिळवला, द्वितीय क्रमांक निर्भय मच्छिंद्र कोळी याच्या चवदार सोयाबीन बिर्याणी या स्टॉलचा आला असून तृतीय क्रमांक अंजली कोळी हिच्या विटनेरचा स्वादिष्ट साबुदाणा वडा या स्टॉलला मिळाला.

## महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रलंबीत विविध विकास कामांबाबत सीईओंनी घेतली बैठक

प्रतिनिधी । पारोळा

**तालुक्यातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत सिंचन विहीर, गाय गोठा शेत पानंद रस्ते ९५/५ रस्ता कॉंक्रिट प्रलंबित मस्टर संदर्भात २६ फेब्रुवारी रोजी म्हसवे गावाजवळ विविध गावातील सरपंच व लाभार्थी यांच्यासोबत रास्ता रोको करण्याचे सरपंच संघटनेचे आंदोलनाचे नियोजन होते.**



जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी सरपंच संघटनेला पत्राद्वारे विनंती केली की तुम्ही जिल्हा परिषद कार्यालय येथे येऊन आमच्याशी सविस्तर चर्चा करा, आम्ही तुमच्या मागण्यांचा विचार करून मागण्या सोडवण्याच्या प्रयत्न करू. त्यांच्या विनंतीस मान देऊन सरपंच संघटनेचे पदाधिकारी व लाभार्थी मीनल करणवाल यांच्याशी चर्चा करून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत येणाऱ्या लाभार्थींच्या कामांचे मस्टर काढण्याचे त्यांनी आश्वासन दिले. व सर्व कामे चालू करण्याचे गटविकास अधिकारी संजय मोरे यांना आदेश दिले. त्याबद्दल सरपंच संघटना व तालुक्यातील लाभार्थ्यांच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. यावेळी सोबत सरपंच परिषद राज्य संघटक अनिल पाटील, सरपंच परिषद तालुकाध्यक्ष शीतल अनिल पाटील, बोळे सरपंच रावसाहेब गिरासे, उंदीरखेडे सरपंच गणेश पाटील, हिरामण रोकडे, ग्रामसेवक सरपंच संघटना तालुकाध्यक्ष सरपंच करंजी बु, निंबा चौधरी माजी सरपंच बहादरपूर, अधिकार पाटील सरपंच दगडीसबगव्हाण, हिरापूर सरपंच वाल्मिक पाटील, बहादरपूर उपसरपंच किरण पवार, गटविकास अधिकारी संजय मोरे यांच्यासह तालुक्याचे सरपंच, उपसरपंच व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नशिराबाद येथे साफसफाई मोहीम सुरू

**नशिराबाद ।** नगरपरिषदेने शहरातील विविध भागांमध्ये गटार साफसफाई मोहीम युद्धपातळीवर राबवली. सकाळपासून नगरपरिषदेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांनी मुख्य रस्ते आणि निवासी भागांमधील बंद पडलेल्या गटारी साफ करून साचलेला कचरा आणि घाण दूर केली. मोहिमेंतर्गत गटारांमध्ये साचलेली माती, प्लास्टिक व इतर कचरा काढून पाण्याचा निचरा सुरळीत करण्यात आला, ज्यामुळे परिसरातील अस्वच्छता कमी होण्यास मदत झाली आणि नागरिकांनाही दिलासा मिळाला.

## बनावट सातबारा, खोट्या नोंदीद्वारे शासनाला ज्वारी विक्री करणारे १३३ व्यापारी रडारवर

प्रतिनिधी । रावेर

शेतकरी असल्याचे बनावट सातबारा उतारे व ज्वारीची लागवड केलेली नसतांना खोटी नोंद सादर करून जिल्ह्यातील १३३ व्यापाऱ्यांनी शासकीय खरेदी केंद्रावर ज्वारी विकल्याचे एका तपासणीतून उघड झाले आहे. त्यात रावेर तालुक्यातील ३१ व्यापाऱ्यांचा समावेश आहे. या व्यापाऱ्यांनी ज्वारी विक्रीद्वारे सुमारे १ कोटी ५८ लाख ८५ हजार ८३७ रुपयांची शासनाची आर्थिक फसवणूक केल्याचे सिद्ध झाले आहे. याप्रकरणी सर्व दोषींवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कारवाई प्रक्रिया सुरु असल्याची माहिती शासन स्तरावरून देण्यात आली आहे. ज्वारी विक्रीसाठी संबंधित व्यापाऱ्यांनी शासकीय दस्तऐवजामध्ये खाडाखोड करीत आर्थिक फसवणुक केल्याचा अहवाल राज्य शासनाला पाठविण्यात आला आहे. त्यामुळे या व्यापाऱ्यांवर कारवाई अटळ असल्याने शासनच्या खरेदी केंद्रावर ज्वारी विक्री केलेल्या व्यापाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

शेतकऱ्यांच्या शेती उत्पादित मालाला योग्य भाव मिळावा या उद्देशाने शासनातर्फे हमी भावाने ज्वारीची खरेदी करण्यात आली आहे. मात्र जळगाव जिल्ह्यातील रावेर, जामनेर, मुक्ताईनगर, चोपडा, व शेंदुर्णी या पाच खरेदी केंद्रावर शेतकरी असल्याचे बनावट सातबारा व ज्वारीची लागवड केलेली नसतांना खोटी नोंद करून १३३ व्यापाऱ्यांनी शासकीय योजनेचा लाभ घेवून शासनाची सुमारे दीड कोटीच्यावर रक्कमेची फसवणूक केली आहे. हा प्रकार चौकशीतून समोर आला असून शासनाची फसवणूक करणाऱ्या १३३ व्यापाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. रावेर खरेदी केंद्रावर ३१ व्यापाऱ्यांनी, जामनेर येथे १४ मुक्ताईनगर येथे ५९, चोपडा येथे १४ व शेंदुर्णी येथे १५ अशा १३३ व्यापाऱ्यांनी १ कोटी ५८ लाख ८५ हजार ८३७ रुपयांची ४,७१२ क्विंटल ज्वारीची शासनाला विक्री करीत फसवणूक केली आहे. बनावट व खोटी कागदपत्रे सादर करून शासकीय योजनेचा लाभ घेतलेल्या व्यापाऱ्यांवर कारवाई अटळ असून यामुळे संबधित व्यापाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

शासकीय खरेदी केंद्रावर ज्वारी विक्री करण्यासाठी या व्यापाऱ्यांनी शासकीय दस्त ऐवजामध्ये खाडाखोड व फेरफार केल्याचा धक्कादायक प्रकार तपासणीतून समोर आला आहे. शासनाच्या हमी भाव खरेदी केंद्रावर व्यापाऱ्यांनी शासनाची दिशाभूल करीत ज्वारीची विक्री केलेली आहे. यामुळे शासनाची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार घडला आहे. शासकीय योजनेचा लाभ घेवून फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. दरम्यान, शासनाची फसवणूक केलेल्या व्यापाऱ्यांमध्ये प्रकरण मिटवण्यासाठी जोरदार हालचाली सुरु झाल्या आहेत. रावेरच्या खरेदी केंद्रावर ज्वारी विक्री केलेले ३१ व्यापारी कोण? याची तालुक्यात चर्चा सुरु असून गुन्हा दाखल झाल्यावर खरे चेहरे समोर येणार आहेत. त्यातील काही व्यापारी शुक्रवारी तहसील कार्यालयात दिसून आले.

### रोहीत वाल्हेची नेटबॉल संघात निवड

प्रतिनिधी । पारोळा

येथील राणी लक्ष्मीबाई महाविद्यालयाचा नेटबॉलचा खेळाडू रोहित नारायण वाल्हे याची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ नेटबॉल स्पर्धेसाठी निवड झाली. रोहितने आंतर महाविद्यालयीन स्पर्धा व आंतर विभागीय स्पर्धेत चांगला खेळ व उत्तम कामगिरी केल्याने त्याची निवड झाली. भोपाळ येथील सेज विद्यापीठात ९ ते १३ मार्च दरम्यान या स्पर्धा होणार आहेत. रोहितला उपप्राचार्य तथा क्रीडा संचालक डॉ. संजय भावसार यांचे मार्गदर्शन लाभले.

# महाराष्ट्र शेतकरी संघटनेच्या आंदोलनाला यश

## शासनाने लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे

प्रतिनिधी । पारोळा

**महाराष्ट्र शेतकरी संघटनेच्या माध्यमातून व संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष व शेतकरी नेते सुनील देवरे यांच्या नेतृत्वामध्ये बाहुटे (ता.पारोळा) येथे कन्हेरे, तुराटखेडे, मराठखेडे, सावखेडे होळ, भालगाव धरण भरण्यासाठीचा गिरणा फीडर कालवा १५ वर्षापासून बंद असल्यामुळे त्या कालव्याला पाणी मिळावे, यासाठी गिरणा कालव्यामध्ये बसून शेतकऱ्यांनी बेमुदत उपोषण आंदोलन करण्यात आले.**



दि.४ फेब्रुवारीपासून महाराष्ट्र शेतकरी संघटनेच्या माध्यमातून जिल्हास्तरावर आणि तालुकास्तरावर सर्वशासकीय यंत्रणा सोबत बैठका चालू होत्या. या बैठकीत शासन सदर कालवा करण्यासाठी तयार नसल्याचे दिसून आल्यानंतर या आंदोलनाची भूमिका संघटनेच्या माध्यमातून घेण्यात आली. सकाळी १० वाजता संघटनेचे सर्व पदाधिकारी, लाभार्थी शेतकरी, ज्येष्ठ नागरिकांनी गिरणा कालव्यात उतरून पाण्यामध्ये बसून आंदोलनाला सुरुवात केली. त्यावर जिल्हा अधीक्षक अभियंता गोकुळ महाजन व त्यांच्या पूर्ण टीमने संपर्क साधून आंदोलकांना आंदोलन मागे घेण्याबाबत विनंती केली असता आंदोलकांची भूमिका स्पष्ट असल्याने जोपर्यंत आमची मागणी पूर्ण होत नाही किंवा आम्हाला लेखी आश्वासन मिळत नाही. तोपर्यंत आम्ही आंदोलन मागे न घेण्याचा पवित्रा घेतला आहे.

या आंदोलनामध्ये महाराष्ट्र शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष डॉ.विनोद चौधरी, कार्याध्यक्ष गुलाब पाटील व जलसंधारण समितीचे तालुकाध्यक्ष एस. झेड. पाटील, भडगाव तालुकाध्यक्ष अभिमन हाटकर पारोळा, सचिव नितीन पाटील, तालुका युवा अध्यक्ष निरंजन पाटील, शिवरे शाखाप्रमुख समाधान पाटील, शुभम पाटील, सागर पाटील, सुखदेव पाटील, पंढरीनाथ खैरनार, गणेश पाटील, विकास पाटील, चतुर पाटील, रवींद्र पाटील, सागर पाटील, आबा पाटील तसेच मुकेश पाटील, प्रवीण पाटील, धनंजय पाटील, समाधान पाटील, तसेच भालगावचे सरपंच गोविंदा पाटील, भिका पाटील, कैलास पाटील, कैलास पाटील, प्रेमराज पाटील आनंदराव पाटील, आनंदराव पाटील, चंद्रकांत पाटील, रवींद्र पाटील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. मागणी पूर्ण झाल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. यासह तुराटखेडे, सावखेडा, भालगाव येथील लाभार्थी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुनसगाव येथे मोहळच्या हल्ल्यात एक जण जखमी

प्रतिनिधी । भुसावळ

**सुनसगाव येथे आगेमोहळच्या मधमाशांच्या हल्ल्याची आणखी एक घटना घडली असून यात एक व्यक्ती जखमी झाली आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व शेतमजुरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**

येथील रहिवासी पंढरीनाथ चांगो कंखरे (धनगर) हे बकऱ्यांसाठी चारा आणण्यासाठी शेताच्या शिवारात बेलव्हाळ रस्त्याने जात असताना अचानक आगेमोहळच्या मधमाशांनी त्यांच्यावर हल्ला केला. या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे ते बेसावध झाले असून मधमाशांनी त्यांच्या चेहऱ्यावर व पाठीवर डंख मारल्याने ते जखमी झाले.जखमी पंढरीनाथ कंखरे यांच्यावर सुनसगाव येथील डॉ. सागर धनगर यांनी उपचार केले असून त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे.



दरम्यान, यापूर्वी १ मार्च रोजी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास सुनसगाव येथील चार महिलांवरही आगेमोहळच्या मधमाशांनी हल्ला करून त्यांना जखमी केले होते. अवघ्या सहा दिवसांच्या कालावधीत मधमाशांच्या हल्ल्याची ही दुसरी घटना घडल्याने परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.या पार्श्वभूमीवर शेतकरी व शेतमजुरांनी शेतात जाताना सावधगिरी बाळगावी, अशी सूचना स्थानिक स्तरावरून करण्यात येत आहे.